**(CNR No.:-MHSO-1900-1761-2025)**
*(कैलास बापु शेळके व १ वि. भारत जरग व इतर)*

## निशाणी क्र.५ वरील आदेश
**(पारीत दिनांक ०६/०५/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादी यांचे विरुद्ध अंतरीम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलला आहे.

०२. वादीचे कथन असे की, वादीने मुळ दावा प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई हुकूमासाठी, नुकसान भरपाई मिळणेकामी व जाहिर होऊन मिळणोकमी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जात असे नमुद केले आहे की, दावा मिळकत क्र.१अ गट क्र.८२५, क्षेत्र ०० हे. ३६.५० आर ही मिळकत वादी क्र.१ यांचे खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. तसेच दावा मिळकत क्र.१ब गट क्र.१५१, क्षेत्र ०० हे. ११ आर ही मिळकत प्रतिवादी क्र.१ व ३ यांचे वडील आणि प्रतिवादी क्र.२ व ४ यांचे आजोबा यांचे नावे आहे. दावा मिळकत १अ वादी क्र.१ यांनी दि.२३/०८/२००१ रोजी रजिस्टर खरेदीखत दस्त क्र.२६७५ अन्वये खरेदी घेतली आहे. सदर खरेदीखत करुन घेतानाही दावा मिळकत क्र.१ब मधील विहीरीमध्ये १/१६ हिस्सा व हक्क, विहीरीवर जाणे–येणेसाठी रस्त्याचा हक्क व त्या मिळकतीमधील एका मोठ्या चिंचेच्या झाडामध्ये १/१६ हिस्सा खरेदी लिहून देणार श्रीकृष्ण अप्पा गांजाळे, त्यास मान्यता देणारे भीमराव विठोबा शिंदे व मारुती कृष्णा गांजाळे यांनी दिलेला होता व आहे. तसेच वादी क्र.२ यांना देखील अशाच प्रकारचा हक्क व हिस्सा त्या मिळकतीमध्ये होता व आहे व त्याप्रमाणे वादी क्र.१ व २ हे नमुदप्रमाणे त्याचा शांततापुर्ण उपभोग व उत्पन्न घेत होते.

०३. दि.२७/०२/२०२५ रोजी प्रतिवादींनी वादीची अगर कोणत्याही सक्षम प्राधिका–याची परवानगी न घेता दावा मिळकत १ब मधील विहीरीच्या शेजारी असणारे चिंचेचे झाड तोडुन टाकले व सदर विहीरीतील पाण्याचे उपभोग घेण्यास व विहीरीवर जाण–येण्याच्या रस्त्याचे वहिवाटीस हरकत, अडथळा निर्माण केला आहे. वादींनी प्रतिवादींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी हे ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. प्रतिवादींचे सदरचे कृत्य चालूच राहिल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच पुन्हा उगवून

आलेले चिंचेचे झाड तोडल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादीचा दावा मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादींनी प्रस्तुत अर्जाव्दारे दावा मिळकतीची आपसात किंवा इतर कोणाही ति–हाईत व्यक्तीस कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत वा तबदिली करु नये, दावा मिळकत गट क्र.१५१ मधील सामाईक चिंचेचे पुन्हा उगवून आलेले झाड तोडू नये, गट क्र.१५१ मधील सामाईक विहीरीचे पाणीचा वापर उपभोग करण्यास व रस्त्याचे वहिवाटीस हरकत, अडथळा करु अथवा करवू नये अशी तुर्तातुत ताकीद प्रतिवादींना देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीचे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१३ वर म्हणणे दाखल केले. प्रतिवादींनी वादीच्या अर्जातील संपुर्ण कथने मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादी यांचे वडील कै.विठोबा पांडुरंग जरग व सुभाष जनार्दन जरग यांनी दावा मिळकत गट क्र.१५१ मधील विहीरीवरील पाण्याची पाळी १/१६ हिस्सा व हक्क मेहरबानी खातीर दिलेला होता. तथपी, सदर मिळकतीमधील चिंचेच्या झाडामध्ये वादी यांना कोणताही हक्क व अधिकार दिलेला नव्हता व नाही. तसेच किसन आप्पा गांजाळे यांना केवळ विहीरीतील पाणी घेणेकरीता व पाळीच्या दिवशी मोटार चालू बंद करण्यासाठी पाऊलवाट मेहरबानी खातीर दिलेला होता व आहे. त्याकरीता प्रतिवादी वडील कै.विठोबा जरग व सुभाष जरग यांनी कोणताही मोबदला स्विकारलेला नव्हता व नाही. त्यामुळे श्रीकृष्ण आप्पा गांजाळे व मान्यता देणार भिमराव शिंदे व मारुती कृष्णा गांजाळे यांना चिंचेच्या झाडामध्ये वादी यांना १/१६ वा हिस्सा खरेदीखताने लिहून देण्याचा कोणताही हक्क व अधिकार नव्हता व नाही.

०५. दावा मिळकत गट क्र.१५१ शी वादीचा कसलाही संबंध नसल्याने त्याबाबत प्रश्न उपस्थित करण्याचा वादीस कोणताही हक्क व अधिकार नाही. दावा मिळकत १ब ही कै.विठोबा पांडुरंग जरग यांची वैयक्तिक मिळकत असल्याने वादीचा त्यामध्ये कोणताही हक्क व अधिकार होत नाही. त्यामुळे दावा मिळकतीमधील वादीचा हक्क व अधिकार हिरावून घेण्याचा कोणताही प्रश्न उद्भवत नाही. दावा मिळकत १ब मधील विहीरीच्या कडा पडुन मोठ्या प्रमाणात गाळ

साठल्याने बंद व पडक्या अवस्थेत आहे व त्याठिकाणी वादी व प्रतिवादी यांचा कोणताही विज कनेक्शन नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीस हरकत, अडथळा निर्माण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रतिवादी यांनी कधीही वादी यांचा विहीरीकडे जाणारी पाऊलवाट अडवली नव्हती व नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा कोणताही हक्क व अधिकार नसल्याने त्यामधील चिंचेचे झाड तोडताना त्यांची परवानगी घेण्याचा कोणताही संबंध नव्हता व नाही. वादीने अर्जातील मजकुर कागदोपत्री पुराव्यानीशी शाबीत केलेले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज सकृतदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादी हे कायदेशीर मार्गाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी यांची आर्थिक कोंडी, मानसीक छळ व कुंचबना करण्याचा प्रयत्नात आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. अर्ज व म्हणणे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस आहे काय ? | **होकारार्थी...** |
| २. | न्यायाचा तौलनिक कल वादीच्या लाभात असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | **होकारार्थी...** |
| ३. | मनाई हुकुम न दिल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल हे वादीने सिध्द केले आहे काय ? | **होकारार्थी...** |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>**कारणमीमांसा**</u>

०७. वादीने त्यांच्या कथनापुष्ट्यर्थ निशाणी क्र.०४, १८ वर खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत:–

१) मौजे कोन्हेरी, ता.मोहोळ येथील गट क्र.१५१ व ८२५ च्या ७/१२ उता–याची

प्रत.

२) वादीने प्रतिवादींना पाठवलेल्या नोटीसीची प्रत.

३) सदर नोटीसीच्या पोस्टाची पोच पावत्या.

४) दावा मिळकतीमधील चिंचेच्या झाडाचे फोटो.

५) दावा मिळकतीचे फोटो.

६) खरेदीखत दस्त क्र.२६७५ ची प्रत.

०८. प्रतिवादी यांनी त्यांचे कथनापुष्टयर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत–

१) विठोबा पांडुरंग जरग व सुभाष जनार्दन जरग यांन दि.०८/०९/२००० रोजी कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साहेब यांचेकडे त्यांचे विहीरीतील पाणीची पाळी मेहरबानी खातर शेजारील शेतकरी यांना विना मोबदला दिल्याचे प्रतिज्ञापत्र.

२) भुमापन गट क्र.१५१ चे जुने ७/१२ उतारे.

३) गट क्र.१५१ चे जुने ७/१२ उतोर.

०९. अर्जातील कथन व म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जामधील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबत</u> –**

(वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्र केलेले आहे)

१०. तुर्तातुर्त मनाई हुकुम ही एक समन्वयीक दाद आहे. वादीला मनाई हुकूम मिळण्यासाठी सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमित नुकसान या बाबी प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा मुळ दावा वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई

हुकूमासाठी, नुकसान भरपाई मिळणेकामी व जाहिर होऊन मिळणोकमी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत तुर्तातुर्त मनाई अर्जाव्दारे प्रतिवादींनी दावा मिळकतीची आपसात किंवा इतर कोणाही ति–हाईत व्यक्तीस कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत वा तबदिली करु नये, दावा मिळकत गट क्र.१५१ मधील सामाईक चिंचेचे पुन्हा उगवून आलेले झाड तोडू नये, गट क्र.१५१ मधील सामाईक विहीरीचे पाणीचा वापर उपभोग करण्यास व रस्त्याचे वहिवाटीस हरकत, अडथळा करु अथवा करवू नये अशी निरंतर मनाई हुकूम प्रतिवादी यांचे विरुध्द देण्यात यावी याकरिता केलेला आहे. वादीच्या कथनावरुन, अभिलेखावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन वादीने प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी समर्थनीय पुराव्याआधारे सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

११. वादी यांच्या कथनानुसार दि.२७/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजणेच्या सुमारास गट क्र.१५१ मधील विहीरीच्या शेजारी असणारे चिंचेचे झाड शासनाची अथवा कोणत्याही सक्षम प्राधिका–याची परवानगी न घेता व वादी क्र.१ व २ यांच्या संमतीशिवाय बेकायदेशीरपणे प्रतिवादींनी तोडले व विहीरीचे पाण्याचे उपभोगास व विहीरीवर जाणा–या रस्त्याचे वहिवाट करणेस हरकत, अडथळा केला. वादीने नि.४ सोबत गट क्र.१५१ चा ७/१२ उतारा, गट क्र.८२५ चा ७/१२ उतारा व अर्जात नमुद केल्याप्रमाणे तोडलेल्या झाडाचा फोटो दाखल केले आहे. प्रतिवादीने कैफियत व म्हणणे दाखल करुन गट क्र.१५१ मधील विहीरीवरील पाण्याचा १/१६ हिस्सा व चिंचेच्या झाडातील हक्क व अधिकार वादीस असल्याचे नाकारले आहे. प्रतिवादीने नि.१६ येथे दि.०८/०२/२००० रोजी तहसिलदार, मोहोळ यांचेसमक्ष मेहरबानी खातर विनामोबदला विहीरीतील पाण्याची पाळी शेजारील शेतक–यांना दिल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. याउलट, वादीने नि.१८ सोबत त्याचे लाभातील दि.२३/०८/२००१ रोजीचे नोंदणीकृत दस्त क्र.२६७५ ची प्रत दाखल केली आहे. सदर नोंदणीकृत दस्ताचे अवलोकन केले असता कृष्णा गांजाळे यांचेकडुन कृष्णाबाई कैलास शेळके यांनी गट क्र.८२५ मधील उत्तरेची लिहून देणार यांच्या संपुर्ण हिश्याची जमीन व गट क्र.१५१ मध्ये १ चालू पाण्याची विहीर व विहीरीवर ५ हॉर्सपावरची इलेक्ट्रीक मोटार त्यापैकी समाईकामध्ये विहीरीत व मोटारीत १/१६ हिस्सा विहीर पाण्यासह, पाणी देणे व नेण्याच्या हक्कासह तसेच विहीरीवर जाणे–येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह तसेच गट क्र.१५१

मध्ये असलेल्या चिंचेच्या झाडामध्ये सामाईकामध्ये १/१६ हिश्यासह झाडापालासह असे मिळकतीचे वर्णन नमुद दिसून येते. सदर दस्त रद्द झाल्याचे कुठेही प्रतिवादींचे कथन नाही.

१२. प्रतिवादींनी कैफियत व म्हणण्याव्दारे वादीचा सदर विहीरीतील व चिंचेच्या झाडातील हक्क नाकारला. म्हणजेच वादीस हरकत, अडथळा केला असे सकृतदर्शनी दिसून येते. या सर्व विवचेनावरुन वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस दिसून येते. परंतु, त्याचवेळी वादीने गट क्र.१५१ या मिळकतीमधील हक्क–अधिकार हस्तांतरीत अथवा तबदिल करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश वादीने मागितला आहे. परंतु, विहीरीतील व चिंचेच्या झाडातील हक्क केवळ वादीच्या लाभात खरेदीखताप्रमाणे मिळाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे त्या पुरताच मनाई आदेश मिळणेस वादी पात्र ठरतात. प्रतिवादींनी चिंचेचे झाड तोडलेले नाही असे कुठेही कथन केलेले नाही. त्यामुळे वादीच्या बाजुने न्यायाचा समतोल दिसून येते व अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

१. अर्ज **(निशाणी क्र.०५)** अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत गट क्र.१५१ मधील सामाईक चिंचेचे झाड पुन्हा उगवून आल्यास तोडू नये तसेच गट क्र.१५१ मधील सामाईक विहीरीचे पाणी वापर, उपभोगास व रस्त्याचे वहिवाटीस हरकत, अडथळा करु अथवा करवू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द देण्यात येते.

३. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR

Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2026.05.06 18:38:07 +0200

**(श्रीमती पी.एस.गोवेकर)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मोहोळ.

दिनांक ०६.०५.२०२६

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | Civil Judge Jr. Division, Mohol. |
| Date | : | 06/05/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 06/05/2026 |
| Judgment Uploaded on | : | 06/05/2026 |